भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील ३० सदनिका मध्ये नविन अत्याधुनिक विद्युत संच मांडणी करणे, भिंतीवर पथदिवे लावणे, तसेच जुने उदवाहन काढून नविन अत्याधुनिक उदवाहन बसविणे या कामाच्या खर्चाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी मंजुर होणबाबत...

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र. जेएलएम-०२१९/प्र.क्र.२४/तुरुंग-२,
मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २४ मे, २०१९.

वाचा:

अपर पोलीस महासंचालक, कारागृह महानिरीक्षक व सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. बीएलडी/भायखळा जि.का./प्र.मा/विद्युतीकरण/प्रस्ताव/७१२/१९ कक्ष-६(३) पुणे-१, दिनांक २१.०१.२०१९.

प्रस्तावना:

भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील ३० सदनिका मध्ये नविन अत्याधुनिक विद्युत संच मांडणी करणे, भिंतीवर पथदिवे लावणे, जिन्यांमध्ये वायरिंग करणे, मिटर खोली अद्यावत करणे इत्यादी या कामाबाबत रु.२६,४०,३६१/- (रुपये सव्वीस लक्ष चाळीस हजार तीनशे एकसष्ट फक्त) इतक्या खर्चाचे अंदाजपत्रके तसेच भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील जुने उदवाहन लिफ्ट काढून नविन अत्याधुनिक उदवाहन विद्युत संच मांडणीसह बसविण्याच्या कामाचे रु.६०,६९,५०५/- (रुपये साठ लक्ष एकोणसत्तर हजार पाचशे पाच फक्त) या २ कामांच्या खर्चाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व निधी मंजूर होणेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला आहे. सदर कामाचे सन २०१८-१९ च्या दरसूचीवर आधारीत सविस्तर अंदाजपत्रक उप अभियंता, रुग्णालय विद्युत उपविभाग यांनी तयार केले असून कार्यकारी अभियंता, मध्य मुंबई यांनी सांक्षाकित केले आहे. छाननीअंती सार्वजनिक बांधकाम विभागाने भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारतीमधील ३० सदनिका मध्ये नविन अत्याधुनिक विद्युत संच मांडणी करणे, भिंतीवर पथदिवे लावणे, जिन्यांमध्ये वायरिंग करणे, मिटर खोली अद्यावत करणे इत्यादी, या कामाच्या अंदाजपत्रकाची किंमत परिगणित करुन रु.२६,०२,६१५/- तसेच भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील जुने उदवाहन लिफ्ट काढून नविन अत्याधुनिक उदवाहन विद्युत संच मांडणीसह बसविणे या कामाच्या अंदाजपत्रकाची किंमत परिगणित करुन रु.५९,८२,७३५/- इतक्या रकमेच्या अंदाजपत्रांस सहमती दर्शविली आहे. त्यास अनुसरुन याद्वारे शासन खालीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय:

भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारतीमधील ३० सदनिका मध्ये नविन अत्याधुनिक विद्युत संच मांडणी करणे, भिंतीवर पथदिवे लावणे, जिन्यांमध्ये वायरिंग करणे, मिटर खोली अद्यावत करणे इत्यादी तसेच भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील जुने उदवाहन लिफ्ट काढून नविन अत्याधुनिक उदवाहन विद्युत संच मांडणीसह बसविणे या २ कामांच्या खर्चाच्या अंदाजपत्रकांस खालील तक्यानुसार प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामांची नावे	रक्कम रु.
१	भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील ३० सदनिका मध्ये नविन अत्याधुनिक विद्युत संच मांडणी करणे, भिंतीवर पथदिवे लावणे, जिन्यांमध्ये वायरिंग करणे, मिटर खोली अद्यावत करणे इत्यादी कामे	रु.२६,०२,६१५/- (अक्षरी रुपये सव्वीस लाख दोन हजार सहाशे पंधरा फक्त)
२	भायखळा जिल्हा कारागृहाच्या आवारातील प्रगती इमारती मधील जुने उदवाहन लिफ्ट काढून नविन अत्याधुनिक उदवाहन विद्युत संच मांडणीसह बसविण्याच्या काम	रु.५९,८२,७३५/- (अक्षरी रुपये एकोणसाठ लाख ब्याऐंशी हजार सातशे पस्तीस फक्त)
एकूण (रुपये अक्षरी पंच्याऐंशी लाख पंच्याऐंशी हजार तीनशे पन्नास) फक्त		**रु.८५,८५,३५० /-**

२. सदर अंदाजपत्रकामध्ये वस्तु व सेवा कर १२ टक्के साठी तरतुदी समाविष्ट करण्यात आली आहे. सदर बांधकामांचे अंदाजपत्रके, नकाशे सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित करणे आवश्यक राहील.

३. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. एच-८, ४०५९, मुख्य लेखाशिर्ष ४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च (४०५९ ०९१२) (०१) (१०१)/(११) (०१) (तुरुंग) (योजनांतर्गत योजना) या लेखाशिर्षाखाली उपलब्ध होणाऱ्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभाग शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/ २०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७.४.२०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग-पाच, अनुक्रमांक-३, नियम १३४ अन्वये प्रशासनिक विभागांना प्रदान करण्यात आलेले अधिकार व सार्वजनिक बांधकाम विभागाने अनौपचारिक संदर्भ क्र.१२८/१९/ इमा-२, दिनांक ७.३.२०१९ द्वारे दिलेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०६०३१६०१२५१७२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Narayan Shrikrishna Karad

Digitally signed by Narayan Shrikrishna Karad
DN: CN = Narayan Shrikrishna Karad, C = IN, S = Maharashtra, O = Government of Maharashtra, OU = Home Department
Date: 2019.06.03 16:16:01 +05'30'

(ना. श्री. कराड)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) अपर मुख्य सचिव,वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,

२) सचिव (बांधकामे), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई,

३) पोलीस महासंचालक (कारागृह), महाराष्ट्र राज्य,मुंबई,
४) अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक,कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
५) विशेष पोलीस महानिरिक्षक (मुख्यालय), महाराष्ट्र राज्य, पुणे,
६) विशेष पोलीस महानिरिक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई,
७) कारागृह उपमहानिरिक्षक, दक्षिण विभाग, भायखळा, मुंबई,
८) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई,
९) महालेखापाल (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर,
१०) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई
११) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई
१२) सार्वजनिक बांधकाम विभाग (इमारती-२), मंत्रालय, मुंबई,
१३) कक्ष अधिकारी, (बियुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई,
१४) निवडनस्ती तुरुंग २, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

****